# के. के. वाघतर्फे आज व्यावसायिक प्रवेशप्रक्रियेवर चर्चासत्र

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी, फार्मसी आणि कृषी व कृषी संलग्न महाविद्यालयाच्या वतीने ''व्यावसायिक अभ्यासक्रम (अभियांत्रिकी, फार्मसी आणि कृषी ) प्रवेश २०२६ : नियम व प्रक्रिया'' या विषयावर शनिवारी( दि.१८) सायंकाळी ५.३० वा. कुर्तकोटी डॉ. शंकराचार्य सभागृह, गंगापूर रोड, नाशिक येथे मार्गदर्शन व चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्रात बारावी पास व सीईटी दिलेल्या विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना बारावीनंतर असलेल्या करिअरच्या संधी व अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतानाची प्रक्रिया याबाबत प्रश्न भेडसावत असतो, त्यासाठी विद्यार्थी व पालकांना योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते. अशा पालक व विद्यार्थ्यांसाठी के. के. शिक्षण संस्थेच्या वतीने प्रवेशप्रक्रिया व नियम यावर मार्गदर्शन आणि चर्चासत्राचे आयोजन केले जात असते. हे चर्चासत्र विनामूल्य आहे. या मार्गदर्शन चर्चासत्रात जास्तीत जास्त पालक व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांनी केले आहे.

**Gavkari, Date: 18/07/2026**